मामासाहेब मोहोळ महाविद्यालय पौड रोड पुणे-३८

# राष्ट्रीय सेवा योजना
# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
## विशेष शिबीर अहवाल
## शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२

१.महाविद्यालयाचे नाव – मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौडरोड, पुणे–३८.

२.प्राचार्यांचे नाव – प्राचार्य डॉ.बाळकृष्ण झावरे – ९५१८३२२४३९

३.कार्यक्रम अधिका–यांचे नाव –१. डॉ.भरत राठोड – ८८८८७९६३५४/९३०९८१५३४९
२. डॉ.निता कांबळे – ९६८९७५७८१२
३. डॉ.महादू बागुल – ७७७४८६८९६६

४.स्वंयसेवकांची संख्या (एकक) – २५० (अक्षरी दोनशे पन्नास)

५.**विशेष शिबिराचे ठिकाण – मु.पो.भालगुडी, ता.मुळशी, जि.पुणे.**

**दि. ०४ जानेवारी २०२२ ते १० जानेवारी २०२२**

६.विशेष शिबिरात सहभागी स्वयंसेवक – १२५

## विशेष शिबीर अहवाल

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पौडरोड, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आजादी का अमृतमहोत्सव व माझी वसुंधरा अभियानाअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष शिबिर मु.पो.भालगुडी, ता.मुळशी, जि.पुणे या ठिकाणी मंगळवार दि. ४ जानेवारी ते सोमवार दि. १० जानेवारी २०२२ या कालावधीत संपन्न झाले.

सदर शिबिराचा उद्‌घाटन समारंभ मंगळवार दि. ४ जानेवारी २०२२ रोजी गावाचे सरपंच श्री.संतोष बबन साठे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. त्यांनी गावाची ओळख करून दिली. तसेच गावात राबविण्यात आलेल्या विविध विकासकामांची माहिती दिली व शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळकृष्ण झावरे यांनी शिबिरातील सहभागी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. गावात शाश्वत अशा स्वरूपाचे काम करावे व त्यातूनच आपला व्यक्तिमत्व विकास घडवावा. तसेच शिबिरात सर्वांनी शिस्तीचे पालन करून शिबिर यशस्वी

रामसाहेब मोहोळ महाविद्यालय
पौड रोड
पुणे-३८

करावे असे स्पष्ट केले. शिबिराच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपसचिव मा.एल.एम.पवारसाहेब उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एस.बी.शिंदे, गावाचे उपसरपंच श्री.संतोष शंकर साठे, श्री.किसन साठे, पोलीस पाटील श्री.आनंद साठे, श्री.बाळू पवार व समस्त ग्रामस्थ उपस्थित होते.

शिबिर उद्‌घाटन कार्यकमाचे प्रास्तविक कार्यक्रम अधिकारी डॉ. भरत राठोड यांनी केले व सूत्र संचलन डॉ.निता कांबळे यांनी केले तर डॉ. महादू बागुल यांनी आभार मानले.

शिबिर कालावधीत बुधवार दि. ५ जानेवारी २०२२ रोजी “जलसंवर्धन” या विषयावर श्री.प्रदीप पाटील यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. त्यांनी जलाचे दैनंदिन कामकाजातील पाण्याचे महत्त्व पटवून दिले व स्वयंसेवकांनी जलसंवर्धनसाठी प्रयत्न करावे असे ते म्हणाले.

गुरूवार दि. ६ जानेवारी २०२२ रोजी श्री.सतिश देशमुख यांनी कृषी पर्यटन या विषयावर विद्यार्थी व ग्रामस्थांना मार्गदर्शन करून पर्यटनाचे महत्त्व पटवून दिले.

शुक्रवार दि. ७ जानेवारी २०२२ रोजी डॉ.नितीन दळवी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन यांनी गावातील महिला व स्वयंसेवकांची आरोग्य तपासणी केली.

शनिवार दि. 8 जानेवारी २०२२ रोजी श्री.संदीप बर्वे यांनी आझादी का अमृत महोत्सव आणि महात्मा गांधी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी स्वातंत्र्यांचा संपुर्ण आढावा घेतला. स्वातंत्र्यांत महात्मा गांधीच्या कार्याचे महत्त्व विदयार्थ्यांना सांगितले व युवकांनी स्वातंत्र्यांचा इतिहास वाचावे. व राष्ट्र निर्माणासाठी तत्पर असावे असे श्री.बर्वेसर यांनी मार्गदर्शन केले.
सविस्तर माहिती द्यावी व त्यांचे प्रबोधन करावे असे सुचविले व त्याप्रमाणे स्वयंसेवकांनी ग्रामस्थांना माहिती दिली.

या शिबीराच्या सात दिवसाच्या कालावधीत अनेक कामे ग्रामस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आहे. यामध्ये गावठाण, रामवाडी, लहाणवाडी, कळमवाडी, बौध्दविहार या ठिकाणी स्वच्छता मोहिम राबविली तसेच प्लास्टीक कचरा गोळा करण्यात आला व प्लॅस्टिक वापरण्याबद्‌दल ग्रामस्थांनी प्रबोधन करण्यात आले. गावातील सांडपाण्याची गटारे व सार्वजनिक पिण्याच्या पाण्याची विहीर स्वयंसेवकांनी स्वच्छ केली. विहीरीकडे जाणा-या रस्त्यांची दुरूस्ती केली.

मामासाहेब मोहोळ महाविद्यालय पौड रोड पुणे-३८

गावातील हमररस्त्यातील झाडांना आळे करण्यात आली. मंदीर परिसर रामवाडी, भालगुडी मंदीर स्वच्छ करण्यात आले.

शिबिर कालावधीत विविध प्रबोधन पर व्याख्यानाच्या बरोबर उर्जाबचत जागृती, ग्रामस्वच्छता, सांस्कृतिक कार्यक्रम, व्यसनमुक्ती व आरोग्य, प्लॅस्टिक वापर टाळण्याबाबतचे प्रबोधन करण्यात आले. गावातील मंदिर परिसर, शाळा परिसर, सांडपाण्याची गटारे इ.ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

तसेच या शिवाय पथनाटय, एकांकिका व गाण्यांच्या माध्यमातून स्वच्छ व स्वस्थ भारत या विषयी प्रबोधन करण्यात आले यामध्ये ग्रामस्थ, महिला बचत गट व विद्यार्थी यांनी सहभाग घेतला.

राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप कार्यक्रम सोमवार दि.१० जानेवारी २०२२ रोजी संपन्न झाला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळकृष्ण झावरे उपस्थित होते. त्यांनी एन.एस.एस. चे स्वयंसेवकांनी गावामध्ये केलेल्या विविध विकास कामांचा आढावा घेतला व स्वयंसेवकांचे कौतुक केले.

शिबीर कालावधीत स्वंयसेवकांना प्रोत्साहन मिळावे यासाठी माजी विद्यार्थी यांनी भेट देवून उत्कृष्ठ स्वयंसेवक मल्हारी खर्ची, सूरज शिराळे, साक्षी बलकवडे, सुषमा साठे व शिबीर उत्कृष्ठ गट म्हणून सिंहगड या गटास गौरविण्यात आले.

सदर शिबीराचे आयोजन संस्था पदाधिकारी व मा.प्राचार्य डॉ. बाळकृष्ण झावरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ.भरत राठोड, डॉ. निता कांबळे, डॉ.महादू बागुल, प्रा. अशोक शेळके,प्रा.निता देशमुख व श्री.नितीन भोसले यांनी केले. शिबीरामध्ये एकूण १२५ स्वंयसेवक सहभागी झाले होते.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय
पौड रोड, पुणे ३८.

प्राचार्य
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय
पौड रोड, पुणे - ३८.